Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

Original Article

# महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेचा अभ्यास

**नितीन दत्तात्रय गोरे**
संशोधक विद्यार्थी,के.जे. सोमैया कॉलेज,कोपरगाव,जि. अहिल्यानगर.
**Email-nitingore11@gmail.com**

**Manuscript ID:**
JRD -2025-170908
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9(A)
Pp.38-41
September 2025
**Submitted:** 22 Aug. 2025
**Revised:** 3 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***घोषवारा***

*अहिल्याबाई होळकर योजना ही एक सामाजिक कल्याणकारी योजना आहे, ज्यामध्ये एका विशिष्ट आर्थिक उत्पन्न मर्यादेत येणाऱ्या लाभार्थ्यांना अनुदान दिले जाते. शिक्षणाला चालना देण्यासाठी, दहावी, बारावी किंवा पदवी पूर्ण केलेल्या मुलींना या योजनेचा लाभ दिला जातो. महिला सक्षमीकरण, शिक्षणाचा दर्जा वाढवणे आणि सामाजिक समानता यामध्ये ही योजना मोलाची भूमिका बजावत आहे. महाराष्ट्रातील लाभार्थी मुलींची संख्या, त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि योजनेचा परिणाम हे या अभ्यासाचे मुख्य भाग आहेत. या योजनेमुळे मुलींनी त्यांचे शिक्षण किती प्रमाणात पूर्ण केले आहे हे मोजणे हा या संशोधनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. अहिल्याबाई होळकर योजनेसाठी सरकार दरवर्षी करत असलेल्या खर्चाचे विश्लेषण देखील या शोधनिबंधात केले आहे. खर्चाच्या तुलनेत लाभार्थ्यांची संख्या आणि शिक्षणाची प्रभावीता यांच्यातील संबंध शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

**प्रस्तावना**

शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तो आवश्यक आहे. विशेषतः मुलींचे शिक्षण केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीसाठीच नाही तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाच्या उन्नतीसाठी देखील उपयुक्त आहे. परंतु ग्रामीण भागात अजूनही सामाजिक आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक मुली शिक्षणापासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर, सरकारने विविध योजना राबवून मुलींच्या शिक्षणाला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र सरकारने मुलींचे शिक्षण बळकट करण्यासाठी "अहिल्याबाई होळकर कन्यादान योजना" सुरू केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या लग्नासाठी आर्थिक मदत देणे आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढवणे आणि बालविवाह रोखणे आहे.

अहिल्याबाई होळकर ही योजना एक सामाजिक कल्याणकारी योजना आहे, ज्यामध्ये विशिष्ट आर्थिक उत्पन्न मर्यादेत येणाऱ्या लाभार्थ्यांना अनुदान दिले जाते. शिक्षणाला चालना देण्यासाठी, या योजनेचा लाभ दहावी, बारावी किंवा पदवीधर झालेल्या मुलींना दिला जातो. ही योजना महिला सक्षमीकरण, शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे आणि सामाजिक समानता वाढविण्यात मोलाची भूमिका बजावत आहे. या शोधनिबंधात वर्षानुवर्षे अहिल्याबाई होळकर योजनेच्या लाभार्थ्यांच्या संख्येचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाचा मुख्य भाग म्हणजे महाराष्ट्रातील लाभार्थी मुलींची संख्या, त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि योजनेचा परिणाम विचारात घेणे. या योजनेमुळे मुलींनी त्यांचे शिक्षण किती प्रमाणात पूर्ण केले आहे हे मोजणे हा या संशोधनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. तसेच, या योजनेसाठी सरकार दरवर्षी करत असलेल्या खर्चाचे विश्लेषण देखील या शोधनिबंधात केले आहे. या योजनेसाठी झालेला खर्च, निधीचे वितरण, महाराष्ट्रातील खर्चाचे प्रमाण इत्यादींचा तपशीलवार अभ्यास करण्यात आला आहे. खर्चाच्या तुलनेत लाभार्थ्यांची संख्या आणि शिक्षणातील परिणामकारकता यांच्यातील संबंध शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17492394
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*नितीन दत्तात्रय गोरे, संशोधक विद्यार्थी,के.जे. सोमैया कॉलेज,कोपरगाव,जि. अहिल्यानगर.*

**How to cite this article:**
*गोरे, . नितीन . दत्तात्रय . (2025). महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेचा अभ्यास. Journal of Research and Development, 17(9(A)), 38–41.* https://doi.org/10.5281/zenodo.17492394

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

एकंदरीत, अहिल्याबाई होळकर योजना ही महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी एक महत्त्वाची योजना आहे. या शोधनिबंधामध्ये लाभार्थ्यांची संख्या आणि खर्च या दोन महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास करून या योजनेची प्रभावीता आणि सामाजिक परिणाम स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. हे संशोधन पुढील धोरण तयार करण्यासाठी उपयुक्त निष्कर्ष आणि शिफारसी प्रदान करेल.

**संशोधन समस्या**

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेच्या अभ्यासात काही महत्त्वाच्या संशोधन समस्या आहेत. २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत या योजनेची अंमलबजावणी एकसमान नव्हती, ज्यामुळे लाभार्थ्यांची संख्या आणि खर्चाचे तुलनात्मक विश्लेषण करणे कठीण झाले. लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचण्यामध्ये असमानता, माहितीचा अभाव, प्रशासकीय विलंब आणि योजनेअंतर्गत आर्थिक मदत वाटपात पारदर्शकतेचा अभाव यामुळे योजनेचा खरा परिणाम मोजण्यात अडचणी निर्माण होतात. म्हणूनच, शोधनिबंधात योजनेच्या प्रभावीतेचे विश्लेषण करताना या समस्या मुख्य समस्या म्हणून समोर येतात. जरी या संशोधनात काही समस्या असल्या तरी, महाराष्ट्र सरकारच्या प्राथमिक शिक्षण संचालनालय आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या २०१९-२० ते २०२३-२४ च्या अहवालानुसार मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्ट**

१. महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थी संख्या आणि खर्चाचे विश्लेषण करणे.
२. २०१२-१३ ते २०२३-२४ या कालावधीत महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थी संख्या आणि खर्चाचा अभ्यास करणे.
३. आवश्यक असल्यास सुधारणेसाठी उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी फक्त दुय्यम साधनांचा वापर केला आहे. त्यामध्ये पुस्तके, शोध निबंध, शोध प्रबंध, आरबीआय अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (२०१९-२० ते २०२३-२४) द्वारे प्रकाशित केलेल्या अहवालांमधून फक्त दुय्यम माहिती गोळा केली आहे.

**तथ्य संकलन आणि माहिती विश्लेषण**

महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेच्या अभ्यासासाठी तथ्य संकलन आणि माहिती विश्लेषण हे संशोधनाचे मूलभूत टप्पा आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थींची संख्या (लाख) आणि खर्च रक्कम (कोटी) मध्ये दर्शवली आहे. याचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शवले आहे.

**तक्ता क्र.१**

**महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थी संख्या आणि खर्च**

(लाभार्थी लाख, खर्च रक्कम रु. कोटी मध्ये)

| अ. क्र. | वर्ष | लाभार्थ्यांची संख्या (लाख) | खर्च रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | २४.७६ | १४१.५९ |
| २ | २०२०-२१ | ७.९१ | ४१.७२ |
| ३ | २०२१-२२ | ७.१२ | ४६.१७ |
| ४ | २०२२-२३ | २१.६१ | ४३२.७८ |
| ५ | २०२३-२४ | २२.३३ | ५३८.५६ |
| **एकूण** | | **८३.७३** | **१२००.८२** |
| **सरासरी** | | **१६.७५** | **२४०.१६** |
| **प्रमाणित विचलन** | | **८.५१** | **२३०.१६** |
| **भिन्नतेचे गुणांक** | | **५०.८३** | **९६.०६** |
| **चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर** | | **-०.०३** | **०.४०** |
| **कमाल** | | **२४.७६** | **५३८.५६** |
| **किमान** | | **७.१२** | **४१.७२** |

स्त्रोत:- प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद २०१९-२० ते २०२३-२४.

वरील तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थी संख्या आणि खर्चाची रक्कम याची माहिती २०१९-२० ते २०२३-२४ या वर्षांमधील दर्शवली आहे. या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

अहिल्याबाई होळकर योजनेतील एकूण लाभार्थ्यांची संख्या ही ८३.७३ लाख इतकी आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येची सरासरी १६.७५ लाख इतकी आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येचा भिन्नता गुणांक ५०.८३ टक्के आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०३ टक्के इतका आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांची सर्वाधिक संख्या ही २०२३-२४ साली २२.३३ लाख इतकी होती. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांची सर्वात कमी संख्या ही २०२०-२१ साली ७.९१ लाख इतकी होती.

या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये अहिल्याबाई होळकर योजनेतील एकूण खर्चाची रक्कम ही १२००.१६ कोटी इतकी आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील खर्चाच्या रक्कमेची सरासरी २४०.१६ कोटी इतकी आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील खर्चाच्या रक्कमेचा भिन्नता गुणांक ९६.०६ टक्के आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील खर्चाच्या रक्कमेचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.४० टक्के इतका आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील सर्वाधिक खर्चाची रक्कम ही २०२३-२४ साली ५३८.५६ कोटी इतकी होती. अहिल्याबाई होळकर योजनेतील सर्वात कमी खर्चाची रक्कम ही २०२०-२१ साली ४१.७२ कोटी इतकी होती. २०२०-२१ आणि २०२१-२२ या कालावधीत कोरोना या जागतिक महामारीचा या योजनेवर मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे. त्यामुळे अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांची संख्या आणि खर्चाची रक्कम ही कमी-जास्त झाल्याचे यावरून स्पष्ट होते.

**निष्कर्ष:-**

महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेतच्या अभ्यासातील काही महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे.

१. महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थी संख्या आणि खर्च रक्कम याची माहिती २०१९-२० ते २०२३-२४ या वर्षांमधील दर्शवली आहे. या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये अहिल्याबाई होळकर योजनेतील एकूण लाभार्थ्यांची संख्या ही ८३.७३ लाख इतकी आहे.
२. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येची सरासरी १६.७५ लाख इतकी आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येचा भिन्नता गुणांक ५०.८३ टक्के आहे.
३. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०३ टक्के इतका आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांची सर्वाधिक संख्या ही २०२३-२४ साली २२.३३ लाख इतकी होती. अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांची सर्वात कमी संख्या ही २०२०-२१ साली ७.९१ लाख इतकी होती.
४. या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये अहिल्याबाई होळकर योजनेतील एकूण खर्चाची रक्कम ही १२००.१६ कोटी इतकी आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील खर्चाच्या रक्कमेची सरासरी २४०.१६ कोटी इतकी आहे.
५. अहिल्याबाई होळकर योजनेतील खर्चाच्या रक्कमेचा भिन्नता गुणांक ९६.०६ टक्के आहे. अहिल्याबाई होळकर योजनेतील खर्चाच्या रक्कमेचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.४० टक्के इतका आहे.
६. अहिल्याबाई होळकर योजनेतील सर्वाधिक खर्चाची रक्कम ही २०२३-२४ साली ५३८.५६ कोटी इतकी होती. अहिल्याबाई होळकर योजनेतील सर्वात कमी खर्चाची रक्कम ही २०२०-२१ साली ४१.७२ कोटी इतकी होती.
७. २०२०-२१ आणि २०२१-२२ या कालावधीत कोरोना या जागतिक महामारीचा या योजनेवर मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे. त्यामुळे अहिल्याबाई होळकर योजनेतील लाभार्थ्यांची संख्या आणि खर्चाची रक्कम ही कमी-जास्त झाल्याचे यावरून स्पष्ट होते.

**उपाययोजना:-**

महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्याबाई होळकर योजना या संशोधनातील महत्त्वाच्या उपाययोजना खालीलप्रमाणे.

**१. योजनेची प्रभावी जनजागृती:**

अनेक गरजू लाभार्थ्यांना अहिल्याबाई होळकर योजनेची माहिती नाही, ज्यामुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळा येतो. त्यामुळे योजनेबद्दल प्रभावी जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, शाळा आणि महाविद्यालये, अंगणवाडी केंद्रे आणि महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. डिजिटल माध्यमांसोबतच पोस्टर्स, बॅनर्स, रॅली, ग्रामसभेत माहिती, स्थानिक रेडिओ किंवा मोबाईल संदेशांचा वापर प्रसिद्धीसाठी करावा. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि शिक्षण विभागाने शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांना योजनेची माहिती देण्यासाठी विशेष उपक्रमांचे समन्वय साधून अंमलबजावणी करावी. तसेच, यशस्वी लाभार्थ्यांची उदाहरणे देऊन इतर पालकांना आणि मुलींना प्रेरित करणे उपयुक्त ठरेल. अशा सर्व माध्यमांद्वारे जागरूकता निर्माण केल्यास पात्र मुलींना योजनेअंतर्गत वेळेवर लाभ मिळू शकतो.

**२. डिजिटल नोंदणी आणि पारदर्शकता:**

अहिल्याबाई होळकर योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी आणि पारदर्शक करण्यासाठी, डिजिटल नोंदणी प्रणाली स्वीकारणे आवश्यक आहे. पारंपारिक पद्धतीमध्ये, कागदावर आधारित प्रक्रिया आणि मध्यस्थांची आवश्यकता अर्जदारांसाठी अडचणी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

निर्माण करते आणि वेळ आणि खर्च देखील वाढवते. डिजिटल नोंदणीद्वारे, लाभार्थ्यांची माहिती एका केंद्रीकृत ऑनलाइन पोर्टलवर गोळा केली जाऊ शकते, जी अर्ज, पात्रता पडताळणी, मंजुरी आणि निधी वितरणाच्या सर्व टप्प्यांवर पारदर्शकता सुनिश्चित करते. आधार-आधारित प्रमाणीकरण, ओटीपी-आधारित लॉगिन आणि ऑनलाइन ट्रॅकिंग सारख्या प्रणालींचा वापर लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जाची स्थिती तपासण्याची आणि कोणत्याही प्रकारची फसवणूक किंवा विलंब टाळण्याची परवानगी देतो. याशिवाय, अधिकाऱ्यांसाठी व्यवस्थापन देखील सोपे होते आणि जिल्हानिहाय किंवा राज्यस्तरीय विश्लेषणासाठी अचूक माहिती उपलब्ध होते. डिजिटल प्रक्रिया गरजू विद्यार्थिनींना वेळेवर आणि निष्पक्ष पद्धतीने लाभ मिळविण्यास मदत करते.

**३. सांख्यिकी माहिती अद्ययावत ठेवणे:**

अहिल्याबाई होळकर योजनेच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी लाभार्थ्यांची सांख्यिकीय माहिती नियमितपणे अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांची संख्यात्मक माहिती अपूर्ण, विस्कळीत किंवा जुनी असल्याचे आढळून येते, ज्यामुळे योजनेचे मूल्यांकन करण्यात अडचणी येतात. वेळोवेळी लाभार्थ्यांची नावे, वय, शैक्षणिक पातळी, जात-वर्ग, आर्थिक स्थिती आणि लाभ मिळाल्याच्या तारखा यासारखी माहिती गोळा करणे आणि ती डिजिटल स्वरूपात जतन करणे आवश्यक आहे. यासाठी शाळा, महाविद्यालये, स्थानिक प्रशासन आणि समाजकल्याण विभागांनी समन्वय साधून माहिती अद्ययावत ठेवण्यासाठी एक प्रणाली तयार करावी. यामुळे योजना कशी, कोणत्या क्षेत्रात आणि किती प्रभावीपणे राबविली जात आहे याचे अचूक विश्लेषण करणे शक्य होईल. अद्ययावत आणि विश्लेषण करण्यायोग्य माहिती केवळ संशोधनासाठीच नाही तर भविष्यातील धोरण ठरवण्यासाठी देखील खूप उपयुक्त आहे.

**४. अंमलबजावणीतील एकसंधता:**

अहिल्याबाई होळकर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध सरकारी विभागांमध्ये समन्वय आणि सुसंगतता आवश्यक आहे. सध्या सामाजिक न्याय विभाग, शिक्षण विभाग आणि जिल्हा परिषदांमध्ये योग्य समन्वयाचा अभाव असल्याने, लाभार्थ्यांची यादी अद्ययावत करणे, निधीचे वितरण आणि माहिती देणे या प्रक्रियेत अनेक वेळा तफावत आढळते. एकात्मिक माहिती प्रणाली, नियमित समन्वय बैठका आणि विभागीय जबाबदाऱ्यांचे स्पष्टीकरण यामुळे अंमलबजावणीत सुसंगतता सुनिश्चित होईल. यामुळे लाभार्थ्यांना वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने योजनेचा लाभ मिळू शकेल.

**५. नियमित मूल्यांकन आणि ऑडिट:**

अहिल्याबाई होळकर योजनेच्या प्रभावीतेचा आढावा घेण्यासाठी, नियमित मूल्यांकन आणि आर्थिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमुळे योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी, समस्या आणि गैरप्रकार उघड होतात आणि सुधारणांना चालना मिळते. स्वतंत्र मूल्यांकन संस्था किंवा तज्ञ समितीने वेळोवेळी अभ्यास करून अहवाल तयार करावा आणि त्यानुसार सुधारणा सुचवाव्यात. तसेच, निधीचा योग्य वापर आणि तो लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी जिल्हा पातळीवर लेखापरीक्षण यंत्रणेला सक्षम केले पाहिजे. यामुळे योजना पारदर्शक राहील.

**६. शाळा आणि महाविद्यालयांची भागीदारी:**

अहिल्याबाई होळकर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शाळा आणि महाविद्यालयांचा सक्रिय सहभाग खूप महत्वाचा आहे. या संस्थांद्वारे लाभार्थ्यांची यादी तयार करणे, विद्यार्थ्यांची ओळख पटवणे आणि आवश्यक कागदपत्रे पूर्ण करणे सोपे होते. शैक्षणिक संस्थांनी योजनेबद्दल जागरूकता मोहीम राबवावी, मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत आणि नोंदणी प्रक्रियेत विद्यार्थ्यांना मदत करावी. याशिवाय, महाविद्यालयांनी सामाजिक जबाबदारी अंतर्गत योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वयंसेवक तयार करावेत. शाळा-महाविद्यालये आणि सरकारी संस्थांमध्ये समन्वय वाढवला तर योजनेचे फायदे अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतात.

**संदर्भग्रंथ:-**


1. T.P.V. Ratnasri and Risbud Mrunal (2016), Comparative Study of Women Development in the Field of Education in Maharashtra and Madhya Pradesh from 2001 to 2011, IMR (Indira Management Reciew), Volume X, Issues 2, PP. 73-82.
2. Kombde S.T. (2019), Progress of School Education in Maharashtra, Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ), Volume- VI, Issue- V, PP. 74-79.
3. Shivcharan Laxman Kottewar (2024), Contribution of Ahilyabai Holkar in social and economic development of women, International Journal for Multidisciplinary Research (IJFMR), Volume 6, Issue 6, PP. 1-3.
4. प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, २०१९-२० ते २०२३-२४.
5. महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, २०१९-२० ते २०२३-२४.